महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत CSO / FPO/CBO/ NGO ची अखर्चिक भागीदारी.

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग (रोहयो)**

**शासन परिपत्रक क्रमांक : मग्रारो-२०२०/प्र.क्र.९७/रोहयो-१०अ**

नवीन प्रशासन भवन, १६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १३ जानेवारी, २०२१.

**प्रस्तावना:**

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विविध प्रकारची कामे केली जातात

१ मृदा व जलसंधारण

२ वृक्षसंगोपण

३ सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन

४ वैयक्तिक लाभाच्या योजना

५ अभिसरण व मुलभूत सुविधांचा विकास

त्याची अंमलबजावणी करताना वरील कामांशी संबंधित अशासकीय संस्थांना सामावून घेतल्यास ही योजना खूप प्रभावीपणे राबविणे शक्य होईल. मृदा व जलसंधारण विषयी पाणी फाउंडेशन व वॉटर सारख्या संस्थांची मदत घेता येईल. बिहार पॅटर्न व वृक्षसंवर्धन यामध्ये सह्याद्री देवराई व वनराई संस्था आहेत. शिवाय सेंद्रिय शेती करणारे शेतकऱ्यांचे गट (FPO) मोठ्याप्रमाणावर कार्यरत आहेत. तसेच बरीच संस्था उपजीविकेवर आधारित काम करतात. काही संस्था निव्वळ जाणीव जागृतीवर काम करतात. महाराष्ट्र राज्याला स्वयंसेवी संस्थांची मोठी परंपरा लाभली आहे. त्यातच अलीकडच्या काळात CSR सारखी व्यवस्था आल्याने बऱ्याच कंपन्या स्वतःचा स्वयंसेवी संस्थांमार्फत किंवा इतर सेवाभावी संस्थांच्या मदतीने सर्व विषयांवर कार्य करतात. नरेगा राबविताना अशासकीय संस्थाची मदत घेतल्यास या संस्थांचा जमीनीवर तळागाळात काम करण्याचा अनुभव व लोकसहभाग मिळविण्याची हातोटी यांचा प्रशासनाला उपयोग होईल. त्याने योजनेत लोक सहभाग वाढून ही योजना प्रभावीपणे राबवून लोकांचे जीवनमान उंचावणे शक्य होईल.

हे सर्व कार्य करीत असताना जेवढ्या अधिक लोकांचा सहभाग मिळेल तेवढेच गाव समृद्ध विचारास चालना मिळणार आहे. त्यासाठी शासन आणि समाज एकत्रित येणे आवश्यक आहे. सातारा जिल्ह्यात पाणी फाउंडेशन सोबत मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे. चिखलदरा आणि अमळनेर तालुक्यांनी विविध बाबींसाठी पाणी फाउंडेशनची मदत घेतली आहे. पाणी फाउंडेशन स्वतःहून राज्यात

१,००० गावांमध्ये काम करीत आहे. पाणी फाउंडेशन सोबत कार्य दोन्ही बाजूने आहे. ते स्वतः कार्य करतात, प्रशासनाला ते सोबतीला घेतात तसेच प्रशासन पाणी फाउंडेशनची मदत घेतांना दिसत आहे. राज्यात सर्वदूर प्रशासन, पंचायती आणि स्वयंसेवी संस्था अशाच पद्धतीने एकसंघतेने कार्य करण्याची गरज आहे. हिंगोली जिल्ह्यात जिल्हा प्रशासन आणि उगम या संस्थेचा नेतृत्वाखाली विविध स्वयंसेवी संस्था एकत्र आल्याने गाव समृद्धी आणि कयाधू नदी पुनरूज्जीवन या दोन्ही विचाराला एकत्रित रूपात पाहिले जात आहे. तसेच काही संस्था ग्रामपंचायतींना लेबर बजेट तयार करणे, कामांचे नियोजन करणे व त्यांची योग्य गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी करणे यात मदत करत आहेत. प्रगति अभियान, नाशिक ही संस्था गेल्या कित्येक वर्षांपासून IEC साहित्य तयार व वितरित करत आहे व प्रशिक्षण ही देत आहे.

राज्यात बरेच संस्था विविध पातळीवर सरपंच प्रशिक्षण, शेतकरी प्रशिक्षण, जाणीव जागृती इत्यादी कार्य करीत आहेत. त्यातच राज्यात आणि राज्याबाहेरील विविध गाव, शेतकरी आणि उद्योजक यांच्या यशोगाथाचे व्हिडिओ दाखवून लोकांमध्ये 'मी समृद्ध तर गाव समृद्ध आणि गाव समृद्ध तर मी समृद्ध' आणि पर्यायाने 'माझा महाराष्ट्र समृद्ध' हा विचार पसरवण्यासाठी ८ व्हिडिओ असणारे पत्र दि २९ आक्टोबर २०२० रोजी निर्गमित करण्यात आले आहे. हे व्हिडिओ राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकास दाखवणे अपेक्षित आहे.

या सर्व व इतरही कामांसाठी आपल्या जिल्ह्यात कार्यरत स्वयंसेवी संस्थांसोबत भागीदारी करार करून घेऊन कामाला अधिक चालना देणे शक्य आहे.

मग्रारोहयोचा कायदा आणि मास्टर सर्क्युलरचा अभ्यास केल्यास दिसून येते की, मगांराग्रारोहयोतून लक्षप्राप्ती/ फलश्रुती करावयाची आहेत. त्याचे काही उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत.

- मनरेगा कायदा परिच्छेद ७ अनुसूची (Schedule) (१) - राज्य शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार पंचायतीच्या प्रत्येक टप्प्यावर माहे ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीत एक अत्यंत सुनियोजीत, सहभागी नियोजनाच्या माध्यमाने कार्यवाही करण्यात यावी. ग्राम पंचायतीद्वारे घ्यावयाची कामे ग्राम पंचायतीने निश्चित करावी व अपेक्षित प्रत्येक कामासह त्याची फलश्रुती नमूद करूनच मान्यतेसाठी ग्राम सभेपुढे ठेवावी.
- परिच्छेद १३ (c) अनुसूची १ मधील तरतुदीनुसार मनरेगा अंतर्गत घ्यावयाच्या प्रत्येक प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक, आरेखन व प्रस्तावित कामाद्वारे अपेक्षित फलश्रुतीच्या तांत्रीक नोट सह असावे.
- मास्टर सर्कुलरच्या प्रकरण ७.१.५ मधील तरतुदीनुसार एखादया कामाची फलश्रुती/फायदे हे काम एकसंघ स्वरूपात केल्यास प्राप्त असेल तर त्या कामाची विभागणी लघु स्वरूपाचे कामात करण्यात येऊ नये. जसेकी १० कि.मी लांबीच्या कालव्याचा गाळ काढावयाचा आहे त्या कामाचे

एकच अंदाजपत्रक करण्यात यावे व एकल स्वरूपात काम करावे त्याचे तुकडे तुकडे स्वरूपात अंदाजपत्रक तयार करून तुकडे पाडण्यात येऊ नये.

- मास्टर सर्कुलर च्या प्रकरण ७.१२.२ मधील तरतुदीनुसार कामाची उत्पादकता/फलश्रुती - ग्राम सभेनी कोणत्याही कामाला मान्यता देण्यापूर्वी त्या कामाची अपेक्षित उत्पादकता/फलश्रुतीची परिगणना करून त्याच्यावर संनियत्रण केले पाहिजे. ग्राम सभेनी मान्यता दिलेली अशी सर्व कामे, त्या कामाची उत्पादकता/फलश्रुती मोजल्या शिवाय बंद करता कामा नये. राज्य सरकार सर्व शासकीय यंत्रणांना प्रत्येक कामाच्या अपेक्षित फलश्रुतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण सत्र नियोजित करेल व त्याच्या उपयोगाबाबत प्रशिक्षित करेल.
- तसेच, मग्रारोहयोतून घेण्यात येणारे निवडक कामांचे फलश्रुती व उत्पादकताबाबतचे Logframe विश्लेषण परिशिष्ट - अ मध्ये दिले आहे.
- त्यास धरुन अलीकडच्या काळात शासन मग्रारोहयोतून समृध्दी ही संकल्पना बळकट करण्यावर भर देत आहे. त्याचे उदाहरणे यावर्षीच्या लेबर बजेट परिपत्रक (५ ऑगस्ट, २०२०), मग्रारोहयो माहिती, जाणीवा आणि प्रशिक्षणे (२ सप्टेंबर, २०२०) शरद पवार ग्राम समृध्दी योजना (१८ डिसेंबर, २०२०) पालक मंत्री पाणंद रस्ते (२७ फेब्रुवारी, २०१८) हे आहेत. याचे काही ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१. शेतकऱ्यांची समृध्दी
२. किफायतशीर शेती
३. कमीतकमी खर्च - जास्तीतजास्त प्राप्ती
    a. मिश्र पिक पध्दती
    b. कमी पाण्यात सिंचन
    c. खतांचा सुनियोजित उपयोग
    d. श्रमदानातून साठवणक्षमतेत वृध्दी
    e. बाजारासोबत उत्तम जोडणी
    f. गुणवत्तापूर्ण शेतमालावर भर
४. जोखीम कमी करण्यास - पुरक व्यवसाय
    a. दुग्ध व्यवसाय
    b. शेळीपालन
    c. कुकूटपालन
    d. मत्स्यपालन
    e. रेशीम उद्योग

५. प्रत्येक संसाधनांचा पूरेपूर उपयोग

a. जनावरांची विष्ठा आणि पालापाचोळ्याचा उपयोग करुन सेंद्रीय खत /गांडूळ खत तयार करणे.
b. त्याची विक्री किंवा शेतात उपयोग.
c. रासायनिक खतावर खर्च कमी करणे.
d. जैविक कीटकनाशक औषध निर्माण करुन वापर.
e. जनावरांच्या मूत्राचा आर्थिक वापर.
f. कमीत कमी शेतात कमीत कमी पाण्याने अधिकाधिक उत्पन्न.

या सर्व बाबतीत स्वयंसेवी संस्थांची मदत मिळाल्यास राज्यात कमी वेळेत एक मोठी चळवळ उभी राहू शकते. म्हणून शासन खालीलप्रमाणे परिपत्रक निर्गमीत करीत आहे.

**<u>शासन परिपत्रक :</u>**

**<u>NGO च्या भागीदारीने खालील बाबी करता येतात :</u>**

**१. माहिती, प्रशिक्षण व संवाद**

a. फलश्रुतीवर आधारित गावाचे विकासाचे नियोजन व कामाची निवड
b. मगांराग्रारोहयो योजनेकडे गरिबांची योजना म्हणून बघीतले जाते - त्या संकल्पनेला बदलून ही योजना त्यांच्या समृध्दीची योजना म्हणून बघितले जावे
c. मगांराग्रारोहयो मार्फत खेडयांचा समग्र विकास शक्य
d. १५ वा वित्त आयोग, जिल्हा नियोजन व विकास समिती व राज्य निधीद्वारे सिमेंट कॉँक्रीटचे रस्ते, मलनि:स्सारण आणि कुशल प्रणव कामे या करिता पुरेसा निधी उपलब्ध
e. ग्रामपंचायतचा विकास आराखडा तयार करताना मजुर प्रवण कामाच्या स्वरूपात मगांराग्रारोहयोचा मोठयाप्रमाणात सहभाग आवश्यक
f. ग्राम पातळीवर काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचारी व पदाधिकाऱ्यांमध्ये योजनेची संकल्पना व नियोजनाबाबतची समज वाढविण्याची गरज
g. जास्तीतजास्त घटकांच्या सहभागी नियोजनावर (Participatory planning) भर देण्याची आवश्यकता

**२. तांत्रिक सहाय्य**

a. माथा ते पायथा - पाणलोटक्षेत्र विकास प्रारूप - GIS आधारीत नियोजन
b. सुक्ष्म व लघुसिंचनाच्या बांधकामाचे आवश्यकतेनुसार नियोजन

c. सामुदायिक सिंचन बांधकाम
d. मिश्र पिक घेण्यासाठी आवश्यक शेत जमिनीचा विकास
e. ग्राम विकासाचा दृष्टिकोन - वायगाव हळद, भिवापूर मिरची, राजापूर हापूस
f. बाजाराकरिता सुलभ मार्ग उपलब्धता
g. ब्रांड व्यवस्थापन (Brand management)
h. आर्थिक नियोजन व वित्तीय शिस्त
i. सामाजिक अंकेक्षण - मत्तेच्या गुणवत्ता व टिकाऊपणाची हमी

३. **सामुदायिक मालकी** (Community Ownership)

a. संसाधानाचा उत्तमरित्या उपयोग
b. विश्वासार्हतेचे व्यवस्थापन
c. मत्तेची सुरक्षा व संरक्षण
d. दोन्ही मार्गानी करावयाचे विचार
    i. मी समृध्द तर गाव समृध्द
    ii. गाव समृध्द तर मी समृध्द/पर्यायाने माझा महाराष्ट्र समृध्द
e. सर्वसमावेशक (लोकशाहीमार्गाने) निर्णय प्रक्रिया
f. निधीच्या अन्य स्त्रोतांशी सहयोगाचे सुलभीकरण

४. **आपत्ती व्यवस्थापन** (Disaster Management)

a. आपत्ती निवारणाला प्रतिसाद
b. गावातील प्रत्येक कुटुंबाला आर्थिक संकटाचे वेळी गावाचा प्रतिसाद. एखादे कुटुंब कोणत्याही कारणाने आर्थिक अडचणीत आल्यास संपूर्ण गावाने त्यांची मदत करणे.
c. बँकाद्वारे भक्कम आणि सतत सहयोग
d. उपक्रमशिलतेत येणाऱ्या अडचणींचे व्यवस्थापन
e. कृषि व्यवसाय हा नफा नुकसाचीच्या चक्राचा भाग, त्यातुन मार्ग काढण्याचे उपाय सुचविणे

५. **MGNREGS मध्ये NGO चा सहभागाचे मुद्दे**

१. मगांराग्रारोहयोजनेत काम करणाऱ्या मजूराचे मत्तेच्या उपयोग, देखभाल व विकासासाठी कौशल्य प्रशिक्षण.
२. उपक्रमशीलता, फलश्रुती-आधारित नियोजन आणि आर्थिक नियोजनावर प्रशिक्षण
३. अभ्यासक्रम संरचनेचे पुनर्निर्धारण करणे.

a. आवश्यक त्या अभ्यासक्रमाचा समावेश

b. संपर्कक्षेत्र वाढवणे व तळागाळापर्यंत पोहोचवणे

४. सामुदायिक मालकी - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियानाला जोडलेल्या ग्रामीण संस्था महत्वाचा सहभाग नोंदवू शकतात, त्यांचे पूर्ण सुसज्ज असे संघटन ग्रामीण भागात अस्तित्वात आहे. त्यांच्या ग्रामीण भागात पसरलेल्या संघटनेच्या माध्यमातून कामांचे सामाजिक अंकेक्षण करणे सुलभ होईल.

५. आपत्ती व संकट व्यवस्थापन - स्वयंसेवी संघटना व ग्रामीण संघटनेच्या सहकार्याने खेडे आपत्ती व संकट व्यवस्थापनात स्वालंबी होऊ शकतील.

## ६. स्वयंसेवी संस्था निवडीचे निकष :

६ अ) मास्टर सर्कुलर २०२०-२१ नुसार जी स्वयंसेवी संस्था निती आयोगाच्या NGO-PS Module अंतर्गत नोंदणीकृत आहे त्या संस्थेला मगांराग्रारोहयोची सहयोगी संस्था म्हणून सहभागी करून घेता येईल. तथापि, स्वयंसेवी संस्थांना कोणतेही आर्थिक साहाय्य न देता सहभागी करुन घ्यावयाचे असल्यामुळे स्वयंसेवी संस्थाच्या निवडीचे निकष खालीलप्रमाणे राहील :

१. विना आर्थिक सहाय्याचे काम करण्याची तयारी असावी.

२. शासकीय क्षेत्रात काम करण्याचा अनुभव असावा.

३. जलसंधारण किंवा सामुदायिक विकासाचे नियोजन क्षेत्रात काम करण्याचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य द्यावे.

४. अशा स्वयंसेवी संस्थाचे प्राशासकिय संघटन आवश्यक त्या जिल्हयात असावे.

५. सदर स्वयंसेवी संस्था निती आयोगाच्या NGO PS Portal वर नोंदणीकृत नसल्यास त्यांना नोंदणी करुन घेण्यासाठी प्रवृत्त करावे.

**६ ब)** वरील मुद्दयाच्या अनुषंगाने ज्या स्वयंसेवी संस्था जिल्हास्तरावर किंवा तालुकास्तरावर प्रशिक्षण, संवाद, श्रमदान, नियोजनात सहयोग, सामाजिक अंकेक्षण, गुणवत्ता मोजमापच्या कामात सहकार्य करण्यास तयार असेल त्यांना जाहिरपणे (वर्तमान पत्रकात, FB, Social Media किंवा इतर माध्यमातून) आवाहन करुन अर्ज मागवून घ्यावे.

अर्ज सादर केलेल्या स्वयंसेवी संस्थांचा रितसर समुपदेशन करुन त्यांची ज्या भौगोलिक क्षेत्रात आणि ज्या कार्यक्षेत्रात काम करण्यास तयारी असेल, त्यांचे कामाचा अनुभव आणि गुणवत्ता पाहता त्याकरिता काम करण्यास रितसर परवानगी देण्यात यावी.

जर आवश्यकतेपेक्षा जास्त स्वयंसेवी संस्थांचे अर्ज प्राप्त झाले तर जिल्ह्याची स्थानिक परिस्थिती बघून प्राधान्यक्रम ठरवून एका प्रकाराचे कामासाठी एक किंवा अधिक स्वयंसेवी संस्थाना त्या ठिकाणी काम करण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी यांना

राहील. याकरीता जिल्हा पातळीवरील रोहयो कार्यालयातील दोन व्यक्तींना विशेष जबाबदारी देण्यात यावी.

अशा प्रकारे स्वयंसेवी संस्थांची निवड झाल्यानंतर त्यांच्यासोबत प्रत्येक स्तरावर संवाद सभा आयोजित करावे.

**७. स्वयंसेवी संस्थांसोबत संवादाचे सुलभीकरण :** तालुक्यात/जिल्ह्यात स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन खांद्याला खांदा लावून कार्य करुन शकतील. याकरिता खालील संवाद सभा आयोजित करण्यात यावेत.

७.१ मासिक संवाद सभा (जिल्हा पातळी) : यात जिल्हाधिकारी व मुकाअ सह सर्व BDO, MIS समन्वयक व जिल्हा कार्यान्वयन यंत्रणा

a. कृषी
b. पशुसंवर्धन
c. फलोत्पादन
d. मृद व जलसंधारण
e. मत्स्य व्यवसाय
f. सामाजिक वनीकरण
g. वन
h. MSRLM
i. JJM
j. आदिवासी विकास विभाग
k. शिक्षण
l. महिला व बाल विकास विभाग
m. सार्वजनिक बांधकाम विभाग

यांना पाचारण करण्यात यावे. या बैठकांमध्ये जिल्ह्यातील कोणत्याही भागात प्राप्त समस्येवर चर्चा करुन त्यावर मग्रारोहयोच्या १) संयोजन (Combination) आणि २) अभिसरणमधून त्या समस्येवर हल शोधून त्यावर नियोजनाबाबत चर्चा करण्यात यावी.

सध्या लक्षात आलेल्या काही समस्या येथे नमूद करण्यात येत आहेत.

१) राज्यात साधारण २ कोटी लोक अजून दारिद्र्य रेषेखाली जगत आहेत.

२) राज्यात काही समाजघटक अजून अडचणीत आहेत. जसे कातकरी, मोळी विकून जगणारे लोक.

३) राज्यात काही क्षेत्र अडचणीत आहेत. पाण्याची पातळी खाली गेलेले तालुके, खार जमीन तयार झालेले तालुके, हंगामी स्थलांतराचे प्रमाण असलेले तालुके.

४) पाणंद रस्त्यांना बारमाही करण्याची आवश्यकता.

५) मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण असणे.

६) समाजात मोठ्या प्रमाणावर रक्तक्षयाचा (Anemia) प्रमाण असणे.

७) देशात पाचवी शिकूनसुध्दा साधारण ५०% मुलांना वाचता न येणे. तसेच, मुलभूत गणितीय क्रियेत दयनीय परिस्थिती असणे.

७.२ मासिक संवाद सभा (तालुका पातळी) : BDO यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पातळीवर बोलावलेले सर्व यंत्रणांचे तालुका स्तरीय अधिकारी या बैठकीत हजर राहतील. चर्चेला मुद्दा जिल्हा स्तरासारखेच राहील.

७.३ विविध प्रशिक्षणांचे नियोजन : APO, PTO, PRI, GRS, रोजगार दिवस, समृध्दी दिवस.

## ८. समृध्दी अभियानाचे आयोजन :

दर वर्षी २६ जानेवारी (गणतंत्र दिवस) ते ३० जानेवारी (हुतात्मा दिवस) वरील सर्व यंत्रणा स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने समृध्दी अभियान खालील घोषवाक्यासह राबविण्यात यावे.

"मी समृध्द तर गाव समृध्द"

"गाव समृध्द तर मी समृध्द"

पर्यायाने "माझा महाराष्ट्र समृध्द"

## ९. मुल्यांकन :

ग्रामीण भागात मग्रारोहयो तसेच इतर बऱ्याच योजनांमधून मोठ्या प्रमाणावर विकासाची कामे करण्यात येत आहेत. त्या कामांना दरवर्षी यशसुध्दा येत आहे. तथापि, त्या कामांचा फलश्रुतीचा दरवर्षी समर्पक मूल्यमापन होत नाही. मग्रारोहयोतून २७५ प्रकारची कामे करता येतात. तसेच, राज्याच्या इतर योजनांच्या अभिसरणातून कामे करुन अतिरिक्त निधी विकास कामाकरिता वापरात येते. म्हणून राज्याच्या नियोजन विभाग (रोहयो) प्रत्येक गाव/ग्रामपंचायतीचा विकास कामांचा फलश्रुती तसेच, प्रक्रियेबाबत स्वयंमूल्यांकनाचा एक मापदंड तयार करीत आहे.

त्या मापदंडात स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाचा मुद्दा सुध्दा जोडण्यात येईल. कोणते मुद्दे घ्यावयाचे यावर सध्या चर्चा सुरु असून त्यात स्वयंसेवी संस्थांशी निगडीत खालील मुद्दे निष्पत्ती असू शकतील.

१. गाव /तालुका/जिल्ह्यांनी किती गावांकरिता स्वयंसेवी संस्थाचा सहभाग मिळविला.

२. गाव/तालुका/जिल्हा यांनी मग्रारोहयोच्या किती कामांकरिता सहभाग मिळवून त्याचा लाभ किती लोकांना मिळवून दिला.

३. स्वयंसेवी संस्थांद्वारे एकूण पूर्णवेळ किती माणसे लावण्यात आली ?

४. स्वयंसेवी संस्थांनी सर्व मिळून एकूण किती प्रकारचे प्रशिक्षण, किती गावांत, किती लोकांना दिले.

५. गावात /तालुक्यात/जिल्ह्यात ग्रामसमृध्दी बाबतीत राबविण्यात आलेल्या अभियानांची संख्या/नावे इ.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०११३१७४६०७०८१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NAND KUMAR

Digitally signed by NAND KUMAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a362ebc5, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NAND KUMAR
Date: 2021.01.13 17:50:11 +05'30'

**( नंद कुमार )**
**अपर मुख्य सचिव (रोहयो)**

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,
४. मा. राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. मा.समिती प्रमुख,महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मुख्य सचिव यांचे सहसचिव
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधानसचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. आयुक्त, नरेगा नागपूर.
११. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे
१३. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
१४. मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
१५. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१६. सर्व जिल्हाधिकारी,
१७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

१८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,

१९. सर्व अधीक्षक अभियंता,पाटबंधारे/सर्व अधीक्षक अभियंता,लघु पाटबंधारे, (स्थानिकस्तर),

२०. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता)

२२. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,

२३. सर्व उपायुक्त (विकास)

२४. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,

२५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,

२६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२७. सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी,रोहयो

२८. सर्व मंत्रालयीन विभाग,

२९. निवडनस्ती रोहयो-१०अ.

## परिशिष्ट - अ

- मास्टर सर्कुलर २०२०-२१ मधील परिच्छेद ७.१२.२ मध्ये नरेगा अंतर्गत तयार होणारे मत्ताचे अपेक्षित आर्थिक प्रभावीपणा, टिकाऊपणा, आणि फलश्रुती/उत्पादकताचे सर्वसाधारण युनिट नमूद आहे, जे खालील प्रमाणे आहे.

| क्रम संख्या | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम योजने अंतर्गत कामे | आर्थिक प्रभावीपणा | टिकाऊपणा | फलश्रुती/उत्पादकता |
|---|---|---|---|---|
| १ | जलसंवर्धन व पाणलोट कामे | पाणी साठविण्याच्या/ लाभार्थी क्षेत्रांच्या प्रत्येक एककाच्या बांधकामाचा खर्च | १)पक्के काम १५-२५ वर्षे २ कच्चे काम ५-१० वर्ष | पुनर्भरण झालेल्या विहिरी/सिंचनाखाली आलेले क्षेत्र/ उत्पादनातील वाढ/ भूजालातील वृध्दी |
| २ | वनीकरण व वृक्ष लागवड | प्रती एकक क्षेत्रफळावर रोपांची पूर्ण वाढ होईपर्यंत (३-४ वर्ष) | वनीकरण झाडे १५-२५ वर्ष | प्रत्येक झाडांच्या पूर्ण आयुष्यमानातील म्हणजेच २०-२५ वर्ष लाभ |
| ३ | सूक्ष्म व लघु सिंचनासहित कालव्याचे सिंचन | ओलिताखाली आणल्या गेलेल्या प्रत्येक एककाच्या क्षउेत्रफळाचा खर्च | १५-२५ वर्ष | वर्षात अनेक पिके घेऊन उत्पादकतेतील एका वर्षातील वृध्दी |
| ४ अ) | सिंचन सुविधा/फलोद्यान / लागवड | रोप पूर्णपणे उत्पादक होईपर्यंत सिंचनाखाली | १५ ते २५ वर्षे | जलस्तर |
| ४ ब) | शेत बंधारे/विकसन | आणलेल्या प्रत्येक एकक क्षेत्रफळाचा प्रती रोप खर्च / विकसित केलेले क्षेत्रफळ एकक | १०-१५ वर्ष | सिंचनाखाली समाविष्ट क्षेत्रफळ/जमीन विकसन/वर्षात अनेक पिके घेऊन उत्पादकतेतील एका वर्षातील वृध्दी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | गाळ काढण्यासहित पारंपारिक जलधीची दुरूस्ती नुतनीकरण | काढलेल्या गाळामुळे पाणी साठवण क्षमतेत प्रती एकर क्षेत्रफळ झालेली वाढ | १०-१५ वर्षे | पाणी साठवण क्षकतेत व भूजलाच्या पातळीत झालेली वाढ |
| ६ | जमिनीचे विकसन | विकसित केलेल्या प्रती क्षेत्रफळ एककाचा खर्च | १५-२५ वर्षे | विकसित क्षेत्र/दरवर्षीच्या उत्पादकतेत झालेली वाढ |
| ७ | पूर नियंत्रण व पूरापासून संरक्षणात्मक कामे | विकसित केलेल्या प्रती क्षेत्रफळ एककाचा खर्च | १०-१५ वर्षे | विकसित क्षेत्र/दरवर्षीच्या उत्पादकतेत झालेली वाढ |
| ८ | ग्रामीण संधानता अ) सिमेंट कॉंक्रीट रस्ते ब) रेती/ रस्ते | संधानतेच्या प्रती किलोमीटर लांबीचा खर्च | अ)१०-१५ वर्षे ब)५-१० वर्षे | लाभार्थी गावे व गावकऱ्यांची संख्या |
| ९ | बांधकामे | बांधलेल्या क्षेत्रफळाचा प्रती एकक खर्च | ४५-६० वर्षे | लाभार्थी गावे व गावकऱ्यांची संख्या |
| १० | शेतीशी संबंधित कामे | एका वेळेस खत निर्मिती करण्याच्या क्षमतेचा प्रती एकक खर्च | ५-१० वर्षे | दरवर्षी मिश्र खत निर्माण करण्याची क्षमता |
| ११ | पशुपालनाशी संबंधित कामे | समावेशित क्षेत्रफळाचा प्रती एकक खर्च | १०-१५ वर्षे | लाभ झालेली कोंबडया/बकऱ्या /गुरे यांची संख्या |
| १२ | मत्स्यपालनाशी संबंधित कामे | दरवर्षी निर्मित माश्यांचा प्रती एकक खर्च | ५-१० वर्षे | दरवर्षी निर्माण केलेले क्विंटल मासे |
| १३ | समुद्री किनारपट्टीवरील कामे अ) मासे | अ)समावेशित क्षेत्रफाळाचा प्रती एकक खर्च ब)समाविशित क्षेत्रफळाचा /झाडाच्या संख्येचा प्रती | अ)१०-१५ वर्षे ब) १५-२५ वर्षे | दरवर्षी वाळवलेले क्विंटल मासे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वाळवण्याची जागा<br>ब) पट्टयातील झाडेझुडपे | एकक खर्च | | |
| १४ | ग्रामीण पिण्याच्या पाण्याशी संबंधित शोष खड्डे, पुर्नभरण खड्डयासारखी कामे | पुनर्भारीत पाण्याचा/ खोदलेल्या मातीचा प्रती एकक खर्च | ३-५ वर्षे | लाभार्थी क्षेत्र/पुनर्भारण केलेल्या पाण्याचे प्रमाण |
| १५ | ग्रामीण स्वच्छतेशी संबंधित | प्रती संडास/घन व द्रव | १०-१५ वर्षे | लाभार्थी व्यक्तींची सख्या |